# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/१०/१७
## दि.०७/१०/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ३१८/१७,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | अजय वाघमारे,वय-३३,रा.समर्थ नगर हिंगणे-खुद,पुणे |
| **आरोपी** | अनिल बाबुराव भरगुडे,वय-४१,रा.साई नगर,माणिकबाग सिहंगड रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/१०/१७ रोजी १९/०० वा.जुन्या पुठ्ठयाचे कारखान्या जवळ रामनगर कॅनोल जवळ वडगांव-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम अनिल बाबुराव भरगुडे हे मित्र असुन,फिर्यादी यांचा मित्र अजित भोकरे व अनिल भरगुडे यांचेमध्ये तंबाखु न दिल्याचे कारणावरुन त्याने अजित यास हाताने मारहाण करीत असताना,फिर्यादी यांनी त्यास समजावुन सांगितल्याचे कारणावरुन त्याने चाकुने फिर्यादी यांचे बरगडी खाली पोटावर भोकसुन,गंभीर जखमी करुन,फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. साळुंखे ९५५२८३५३९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १८७/१७,भादविक ४९८(अ),३०६,३४ |
| **फिर्यादी** | सुरेश निकम,वय-५६,रा.डिफेन्स कॉलनी,गणेश नगर बोपखेल,पुणे |
| **आरोपी** | १.विशाल वासुदेव शेलार,वय-२८,रा.दत्तगड,दिघी,पुणे (अटक) व इतर चार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे एप्रिल २०१५ ते दि.०६/१०/२०१७ रोजीचे कालावधीत दत्तगड दिघी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.नम्रता विशाल शेलार,२७,रा.दत्तगड दिघी,पुणे हिस तीचा पती विशाल वासुदेव शेलार या इसमा बरोबर होवुन,ती त्याचेबरोबर सासरी नांदत असताना,तीचा पती व इतर इसमांनी आपसात संगनमत करून,सौ.नम्रता हिस माहेराहुन माहेराहुन चार चाकी गाडी घेण्यासाठी दोन लाख रुपये आणावेत. तसेच इतर घरगुतीचे किरकोळ कारणावरुन भांडण करुन,सौ.नम्रता हिस शारिरीक व मानसिक छळ करून,तीस राहते घरी उंदीर मारण्याचे औषध पिऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. भुजबळ ९५६११३१४२६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३५१/१७,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | दत्तात्रय काटम,पो.हवा.दरोडा प्रतिबंधक पथक,गुन्हे शाखा पुणे शहर |
| **आरोपी** | १)राज ऊर्फ दादा दत्तात्रय वायकर,वय-२३ वर्षे,रा.थिटे वस्ती,पुणे २)सोमेश किसन गायकवाड,वय-२४ वर्षे,रा.गायरान वस्ती केशवनगर,मुंढवा,पुणे ३)संजय दत्तु कंधार,वय-२६ वर्षे,रा.म्हातोबानगर,सनं.१०६,कोथरुड,पुणे ४)विश्वास रामेश्वर कुरंगळे,वय-२६ वर्षे,रा. उबाळे नगर,साई सत्यम पार्क,वाघोली,पुणे ५)बालाजी तुकाराम बेलसरे,वय-३६ वर्षे,रा. क्रांतीसेना बोर्डाचे समोर,सुतारदरा,कोथरुड,पुणे (अटक) व इतर एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/१७ रोजी १४/५० वा.वर्टेक्स इंजिनिअरींग कंपनीच्या जवळ मोकळे जागेत फुरसुंगी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल |

|  |  |
|---|---|
|  | अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे एक स्टीलचा चाकु,<br><br>एक स्टीलचा चॉपर,एक फोल्डींगचा चाकु,एक छऱ्यांची पिस्टल,सेल्फ डिफेन्स स्प्रे,एक स्टिलची व बनावट पिस्टल इत्यादी घातक शस्त्रे तसेच चार मोटार सायकल असा सर्व मिळुन ३,२२,२५०/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,कोणत्यातरी बँकेची कॅश घेऊन जाणाऱ्या वाहनावर स्वतःचे आर्थिक फायद्या साठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ ते ५ इसमांसह मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | सहाय्यक पोलीस निरीक्षक, लक्ष्मण ढेंगळे, दरोडा प्रतिबंधक पथक,गुन्हे शाखा,पुणे शहर |
| **४** |  |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३५१/१७,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | माधव मोरे,वय-२२ वर्षे,रा.लोहीयानगर,मगरपट्टा चौक,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | १.अमर विजय कुटे,वय-४०,रा.ठुबे नगर,ठुबे वस्ती,खराडी,पुणे २.निरज राजीव देठे,वय-३०, रा.सनं.५२/३,मारुती नगर,वडगांव-शेरी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/१७ रोजी १९/०० वा. पॉप्युलर कंट्री लिकर बार,गणेशनगर,वडगाव-शेरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पॉप्युलर कंट्री लिकर बार, गणेशनगर, वडगाव शेरी, पुणे येथील देशी दारुचे दुकानात काम करीत असताना,यातील नमुद इसमांनी काऊंटरच्या आतमध्ये येऊन मला व योगेश आगरवाल यांना हाताने ढकलुन दुकानाचे गल्ल्यातील रोख रक्कम ४४,८००/- रुपये जबरदस्तीने चोरुन नेले आहेत. (यातील नमुद इसमांना चंदननगर पो स्टे कडील स्टाफने बातमीदारामार्फत बातमी मिळवुन पकडलेले आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नामदे ९५५२५ १३०८६ |
| **५** |  |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ५६८/१७,भादविक १४३,१४७,१४९,५०४,४२७,क्रि.लॉ.ॲक्ट क.४,७,सार्व.मालमत्ता नुकसान क.३ |
| **फिर्यादी** | भुजंग जाधव,वय-४०,रा.आंबेडकर वसाहत,निगडी,पुणे |
| **आरोपी** | १)ओंकार ऊर्फ डोणक्या आनंत कदम,वय-२०,रा.ज्ञानेश्वर सोसा.चिखली,पुणे २)राजेश ऊर्फ राज्या युवराज हजारे,वय-२०,रा.माऊल सोसा. चिखली,पुणे ३)करण भरत मांगडे,वय-२०,रा श्रमसाफल्य सोसा.चिखली,पुणे ४)दिनेश हरी हिराचंद शिंदे,वय-२१,रा.नंदनवन सोसा.चिखली ५)अंकेत ऊर्फ बंटी नवनाथ पडवळ,वय-२३,रा.माऊली सोसा.चिखली,पुणे ६)अजित ऊर्फ अज्या प्रदिप कांबळे,वय-१९,रा.श्रीसाई सोसा.चिखली,पुणे ७)सचिन शहादेव वक्त,वय-२०,रा. साईशरण सोसा.चिखली,पुणे ८)निखिल दशरथ सुतार,वय-२२,रा.श्रमसाफल्य सोसा.चिखली, पुणे ९)रोहित रावसाहेब करपे,वय-१९,रा.परिवर्तन सोसा.चिखली,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/१०/१७ रोजी २०/१० वा. घरकुल बस स्टॉप व चिखली परिसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पीएमपीएमएल बसवर चालक म्हणुन नोकरी करीत आहे. यातील नमुद इसमांनी काही एक कारण नसताना दहशत माजविण्याचे उद्देशाने सदर परिसरात मोठ-मोठयाने आरडा-ओरडा व शिवीगाळ करुन,काठयाने व दगडाने सदर ठिकाणी उभ्या असलेल्या पीएमपीएमएल बसच्या व रोडवरील इतर तीन वाहनांच्या काचा फोडुन सदर वाहनांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. योगेश आव्हाड ९९२३७९७१०४ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ५७३/१७,भादविक ३५३,३२३,५०४,५०६,३४ ,सह.महा.वैदय सेवा आणि वैदय सेवा संस्था (हिंसक कृत व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) २००९ चे क.४ |
| **फिर्यादी** | डॉ.प्रियांका पाटील,वय-२९ वर्षे,रा.पिपंरी,पुणे |
| **आरोपी** | एक महिला व त्यांचे नातेवाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०१७ रोजी सकाळी ०४/३० ते ०५/०० वा. चे दरम्यान वाय.सी.एम हॉस्पीटल प्रसुती कक्ष,संत तुकाराम नगर,पिपंरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया प्रसुती कक्ष वाय.सी.एम हॉस्पीटल,पिपंरी,पुणे येथे कर्तव्यावर असताना,यातील नमुद रूग्ण महिला हिने नवजात बाळाला जन्म दिल्यानंतर,तीचे जन्मलेल्या बाळाचा मृत्यु हा बाळाची नाळ त्याच्या गळयाभोवती गुंडाळलेली असल्या मुळे,त्या बाळाचा गुदमरुन मृत्यु झाला. पंरतु सदर रूग्ण महिलेच्या नातेवाईकांनी बाळाच्या मृत्युस डॉक्टरच जबाबदार आहेत असा राग मनात धरुन,फिर्यादी यांचे प्रसुती कक्षामध्ये येवुन शिवीगाळ करून,आमचे बाळ कुठे आहे,आम्हाला दाखवा असे म्हणुन फिर्यादी यांचे अंगावर येवुन त्यांना मारहाण केली. तसेच फिर्यादी यांचेबरोबर असलेल्या दुसऱ्या महिला वय अंदाजे २५ ते ३० वर्षे यांचे केस ओढुन व खांदयाला पकडुन दरवाज्यावर आपटुन मारहाण करून,तु येथुन कशी बाहेर जाते व येथे कसे काम करतेस तेच बघते असे म्हणुन धमकी देवुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामामध्ये अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. कडाळ ९५२७४६२३०० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ७८८/१७,भादविक ३५३,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | प्रविण झगडे,वय-३५ वर्ष,रा.महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/१०/२०१७ रोजी दुपारी १३/०० वा. भुमी अभिलेख कार्यालय येरवडा पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे भुमी अभिलेख कार्यालय शासकिय बंगला नं.०५ येरवडा,पुणे येथे भुकर मापक या पदावर नोकरी करत आहे. फिर्यादी हे त्यांचे सहकारी यांचेसह त्यांना नेमुन दिलेले सरकारी कार्यालयीन कामकाज करीत असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे सरकारी कार्यालयात येवुन झगडे कोण आहेत असे विचारुन,तुम्ही आमचे शेजारी असणारे जयंत माणिकलाल लुनावत,रा.बालेवाडी,ता.हवेली,जि.पुणे यांची मोजणी मला न विचारता कशी काय केली असे म्हणुन,फिर्यादी हे त्यांचे सरकारी पध्दतीने मोजणीचे कामकाज करीत असताना,अचानक मोठ-मोठयाने ओरडुन वाईट-वाईट शिवीगाळ करून,फिर्यादीस हाताने मारहाण करून,तु ऑफिसचे बाहेर भेट, तुझ्याकडे बघुन घेतो असा दम देवुन,फिर्यादी हे करीत असलेले सरकारी कामाकाजा मध्ये अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गवारी ९९२३५०९८९२ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १७२/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | महंतकुमार तिवारी ,वय-२७ वर्षे,रा.कोरेगाव पार्क,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०९/२०१७ रोजी ११/४७ वा.ते दि.१९/१०/२०१७ रोजी रात्रौ ००/१५ वा. चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे फिर्यादी यांचे राहते घरात असताना त्यांचे बँक खात्यातुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी असताना,त्यांचे खाजगी बँकेचे खाते असलेले डेबिट कार्ड जवळ असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने बनावट कार्डचा वापर करून,फिर्यादी यांचे बँकेतील त्यांच्या बचत खात्यातील रक्कम जोगेश्वरी,मुंबई येथील एटीएम सेंटर मधुन १,००,०००/- रूपये व बोनी प्लाझा, एस.व्ही.रोड,अंधेरी,मुंबई येथील एटीएम सेंटर मधुन १,००,०००/- रूपये असे एकुण २,००,०००/- रूपये काढुन घेवुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) ज्ञानेश्वर भोसले ९९२३३८८६४८ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५०४/१७,भादविक ४२९, प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्या बाबत अधिनियम १९६० चे कलम ११(१)(सी)(एल) |
| **फिर्यादी** | सौ.निना राय,वय-५२ वर्षे,रा.एरंडवणे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०९/२०१७ रोजी १३/०० वा.चे पुर्वी (नक्की तारीख व वेळ माहित नाही),अथश्री सोसायटीचे समोरील मोकळया मैदानात,पॅनकार्ड क्लब रोड,बाणेर,पुणे येथे |
| **तपशिल** | अथश्री सोसायटीचे समोरील मोकळया मैदानात,पॅनकार्ड क्लब रोड,बाणेर,पुणे येथे सदर परिसरात असलेल्या काही श्वानांना,कोणीतरी अज्ञात इसमाने कसलेतरी विषारी पदार्थ देवुन किंवा खाऊ घालुन श्वानांना मारुन,त्यांचे अंगावर कसलेतरी ज्वलनशील पदार्थ टाकुन त्यांना जाळुन टाकले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, प्रमोद क्षीरसागर ९०७७१००१०० |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९७४/१७,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | मुस्तफा बागवान,वय-४० वर्षे,रा.शिवनेरी नगर कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/१७ रोजी सकाळी ०९/०० वा. भाजी मंडई हडपसर,पुणे या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्याद यांना एक लाख रुपयांच्या बदल्यात एक हजार विदेशी चलनाच्या नोटा देण्याचे मान्य करून,नमुद वेळी व ठिकाणी सदर इसमांनी फिर्यादी यांचेकडुन एक लाख रुपये घेतले. परंतु त्या रूपयाचे बदल्यात फिर्यादी यांना एक हजार विदेशी चलनाच्या नोटा न देता,रद्दी कागदाचे तुकडे देऊन पळुन जावुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. झंजाड ८८८८८६९९७५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**